| | |
|---|---|
| मा. महापालिका आयुक्त,<br>पुणे महानगरपालिका.<br>ठराव क्र. :-१/९५८<br>दिनांक :-०८/१०/२०२१ | महापालिका आयुक्त कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे-५.<br>जा.क्र. :- मआ/साप्रवि/आस्था/ ६०१०<br>दिनांक :-०८/१०/२०२१ |

- आ ज्ञा प त्र -

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' वर्ग-१ या पदावरुन 'अधिक्षक अभियंता (स्थापत्य)' वर्ग-१ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :- १) मा. शहर सुधारणा समितीचा ठराव क्र. २९, दिनांक १८/०५/२०२१.

२) मा. मुख्य सभा ठराव क्र. ३, दिनांक १९/०५/२०२१.

३) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/९५८ दि. ०८/१०/२०२१

पुणे महानगरपालिका अभियांत्रिकी संवर्गातील 'अधिक्षक अभियंता (स्थापत्य)' वर्ग-१ (वेतनश्रेणी रू.१५,६०० ते ३९,१०० + ग्रेड पे ७,६००) या पदावर 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' वर्ग-१ (वेतनश्रेणी रू.१५,६०० ते ३९,१०० + ग्रेड पे) या निम्न पदावरून खालील अधिकाऱ्यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) अन्वये संदर्भ क्र. १ ते ३ चे मान्यतेनुसार या आज्ञापत्राचे दिनांकापासून खालील तपशीलाप्रमाणे तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ .क्र. | अधिकारी यांचे नाव व जातीचा प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | तदर्थ पदोन्नतीचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सबनीस मीरा श्रीनिवास (खुला) | ज्येष्ठतेनुसार | प्रकल्प क्र. १ कार्यालय | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| २ | श्री. कदम सुधीर माणिकराव | ज्येष्ठतेनुसार | बांधकाम विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |

१) उपरोक्त पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामन्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ चे अधिन राहून करण्यात येत आहे.

२) उपरोक्त अधिकारी यांची 'अधिक्षक अभियंता (स्थापत्य)' पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(अ) सदर अधिकाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

(ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.